12 MAR 2021
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कौशल्य विकास काळाची गरज

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के; कौशल्य विकास केंद्र कार्यालयाचे उद्घाटन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांनी कोणतीही पदवी संपादन करत असताना एखादे तरी कौशल्य आत्मसात करणे आवश्यक आहे. केवळ शिक्षण घेऊन विद्यार्थी गतिमान होणार नाहीत, तर यासाठी कौशल्य शिक्षण गरजेचे आहे. सर्वांगीण विकासासाठी कौशल्य विकास होणे काळाची गरज आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राच्या नवीन कार्यालयाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, शासनाने कौशल्य विद्यापीठ स्थापन करायचा निर्णय घेतला आहे. यावरून कौशल्य विकासाचे महत्त्व लक्षात येते. केवळ शिक्षण घेऊन रोजगार मिळणार नाही यासाठी वेगवेगळी कौशल्ये विद्यार्थ्यांनी आत्मसात करणे गरजेचे आहे.



**कोल्हापूर : कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राच्या नवीन कार्यालयाच्या उद्घाटनप्रसंगी कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील, आदी. (छाया : पप्पू अत्तार)**

यावेळी उद्योजकता माहिती संचाचे अनावरण कुलगुरू शिर्के यांच्याहस्ते झाले. केंद्राचे समन्वयक प्रा. डॉ. ए. एम. गुरव यांनी प्रास्ताविक केले. यावेळी विज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता प्रा. डॉ. आर. के. कामत, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे संचालक प्रा. डॉ. एम. एम. देशमुख, विद्यार्थी विकास केंद्राचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, एनएसएसचे संचालक डॉ. अजय जायभाये, प्लेसमेंट विभागाचे डॉ. गजानन राशिनकर उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष

11 MAR 2021 लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाचे ५१० कोटींचे अंदाजपत्रक

## विद्यार्थी सुविधा, संशोधनाला प्राधान्य; इमारती उभारणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : मेरिट स्कॉलरशीप, दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी सोयी-सुविधा, नवीन वसतिगृह आणि चार इमारतींची उभारणी, पाच वसतिगृहांची दुरुस्ती, ज्येष्ठ नागरिकांसाठी उपक्रम, इनडोअर स्पोर्टस् कॉम्प्लेक्स, आदी विद्यार्थी सुविधा आणि रिसर्च स्किमव्दारे संशोधनाला २०२०-२०२१ च्या अंदाजपत्रकामध्ये (बजेट) शिवाजी विद्यापीठाने प्राधान्य दिले आहे. यावर्षीचे ५१० कोटी २२ लाख रुपयांचे अंदाजपत्रक बुधवारी अधिसभेने (सिनेट) मंजूर केले. हे अंदाजपत्रक ८ कोटी ८२ लाख रुपये इतक्या तुटीचे आहे. विद्यापीठ निधीमधील शिलकेतून ही तूट भरून काढण्यात येणार आहे.

देखभाल, विकास, वेतन, संस्था योजना, निलंबन लेखे यामध्ये विभागलेले विद्यापीठाचे अंदाजपत्रक अधिसभा सदस्य ॲड. धैर्यशील पाटील यांनी मांडले. या अंदाजपत्रकावर अधिसभा सदस्यांनी मते, सूचना मांडल्या. त्याच्यासह वार्षिक अहवाल, विद्यार्थी विकास विभागाच्या अहवालास मंजुरी दिली. या अंदाजपत्रकात अपेक्षित जमा रुपये ५१० कोटी २२ लाख आणि अपेक्षित खर्च ५१९ कोटी ४ लाख इतका आहे. त्यामध्ये ऑनलाईन बुक्स, जर्नल खरेदीसाठी ग्रंथालय विभागाला अडीच कोटी, विद्यार्थिनी वसतिगृहासाठी १ कोटी ३१ लाख, विद्यार्थ्यांच्या नवीन वसतिगृहासाठी १ कोटी १० लाखांची तरतूद केली आहे.

विद्यापीठाच्या संरक्षक भिंतीलगत एकूण आठ किलोमीटरचा डांबरी रस्ता आणि त्याला लागून वॉकिंग, सायकलिंग ट्रॅक करण्यासाठी १ कोटी १० लाखांची तरतूद केली आहे.

### अशा असतील नव्या तरतुदी

- ज्येष्ठ नागरिकांच्या उपक्रमासाठी ३ लाख
- राजर्षी शाहू लोकविद्या, लोकसंस्कृती अभ्यासकेंद्रासाठी ३.६५ लाख
- स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रासाठी ४.५५ लाख
- यूथ, स्पोर्टस् हॉस्टेल आणि यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटच्या नव्या इमारतीसाठी प्रत्येकी ५० लाख
- छत्रपती संभाजी महाराज रिसर्च सेंटरसाठी ५ लाख
- परदेशी विद्यार्थी वसतिगृहासाठी ४१ लाख
- मेरिट स्कॉलरशीपसाठी २० लाख
- रिसर्च स्किमसाठी ३ कोटी ९१ लाख



### असा होईल जमा-खर्च (आकडे कोटींत)

| विभागांचा तपशील | जमा | खर्च |
|---|---|---|
| प्रशासकीय | ३८.८० | ६३.६१ |
| शास्त्र | ३.४० | ५.६५ |
| इतर अधिविभाग | २.६३ | ५.१६ |
| इतर उपक्रम | २५.६१ | ४०.६४ |
| वेतन | १२४.८० | १२९.७४ |
| विविध संस्था | ७.८२ | ७.७३ |
| संशोधन व विकास निधी | २३.४८ | २३.४८ |
| घसारा निधी | १५.०८ | १५.०८ |
| निलंबन लेखे | २६८.६० | २२७.६५ |

**८ कोटी ८२ लाख**

रुपये इतक्या तुटीचे हे अंदाजपत्रक आहे. विद्यापीठ निधीमधील शिलकेतून ही तूट भरून काढण्यात येणार आहे.

11 MAR 2021 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाचा काटकसरीचा ५१९ कोटींचा अर्थसंकल्प सादर

**८.८२ कोटींची तूट; कोरोनाच्या पार्श्वभूमीवर काटकसर**

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कोरोना महामारीच्या पार्श्वभूमीवर शिवाजी विद्यापीठाचा ५१९ कोटी रुपयांचा वार्षिक अर्थसंकल्प सादर करण्यात आला. २०२१-२२ या वर्षाची अपेक्षित जमा ५१०.२२ कोटी असून, अपेक्षित खर्च ५१९.०४ कोटी आहे. अंदाजपत्रकात ८.८२ कोटी रुपयांची तूट असून, विद्यापीठ निधीतील शिलकीतून ही तूट भरून काढण्यात येणार आहे. अर्थसंकल्पात शैक्षणिक संशोधन कार्य, संशोधन चालना, दिव्यांग सुविधांसाठी भरीव तरतूद करण्यात आली आहे.

विद्यापीठाची अधिसभा बुधवारी झाली. ॲड. धैर्यशील पाटील यांनी अंदाजपत्रक सादर केले. वेबबेस अंदाजपत्रक प्रणालीत विभाग व अधिविभाग यांना स्वतंत्र ऑनलाईन लॉगईन उपलब्ध करून दिले आहे. यंदाचे अंदाजपत्रक देखभाल, विकास, वेतन अंदाजपत्रक, एजन्सी स्कीम, निलंबन लेखे या पाच पान ४ वर »

# शिवाजी विद्यापीठाचा काटकसरीचा ५१९ कोटींचा अर्थसंकल्प सादर

(पान १ वरून) विभागांत विभागले आहे. २०२१-२२ या वर्षात प्रशासकीय विभागाकडून ३८.८० कोटी, शास्त्र अधिविभागांकडून ३.४० कोटी, इतर अधिविभागांकडून २.६३ कोटी जमा होण्याची अपेक्षा आहे.

इतर उपक्रमांतून २५.६१ कोटी असे ७०.४० कोटी विद्यापीठ स्वनिधीत जमा होणे अपेक्षित आहे. वेतन अनुदानापोटी शासनाकडून १२४.८० कोटी, तर वेगवेगळ्या संस्थांकडून विविध प्रकल्पांसाठी ७.८२ कोटी जमा अपेक्षित आहे. विद्यापीठाच्या संशोधन व विकास निधीतून २३.४८ कोटी रक्कम व घसारा निधीच्या शिल्लक रकमेतून १५.०८ कोटी रक्कम जमेकरिता प्रस्तावित केली आहे. निलंबन लेख्यांमधून २६८.६० कोटी असे ५१०.२२ कोटी जमा होणे अपेक्षित आहे.

## अर्थसंकल्पात यंदा नवे काय...

ज्येष्ठ नागरिक उपक्रमासाठी ३ लाख, लोकविद्या व लोकसंस्कृती अभ्यासासाठी राजर्षी शाहू लोकविद्या, लोकसंस्कृती अभ्यास केंद्राकरिता ३.६५ लाखांची तरतूद केली आहे. स्पर्धा परीक्षा कोचिंग सेंटर ४.५५ लाख, फायर सेफ्टीसाठी ५० लाखांची तरतूद केली आहे. यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंट विभागाच्या नवीन इमारतीकरिता ५० लाख, स्पोर्टस् हॉस्टेलकरिता नवीन इमारत बांधकामाकरिता ५० लाख, पेरिफेरल रोड फॉर सिक्युरिटीसाठी २५ लाख, छत्रपती संभाजी महाराज रिसर्च सेंटरकरिता ५ लाख, यूथ हॉस्टेल नवीन इमारत बांधणीसाठी ५० लाख रुपये आदी तरतुदी प्रथमच अर्थसंकल्पात करण्यात आल्या आहेत.

खर्चाकरिता प्रशासकीय विभाग ६३.९१ कोटी, शास्त्र अधिविभाग ५.६५ कोटी, इतर अधिविभाग ५.१६ कोटी, विविध सेवा व इतर उपक्रम ४०.६४ कोटी असा विद्यापीठ स्वनिधीमधील ११५.३६ कोटी खर्च अपेक्षित आहे. वेतन अनुदान खर्च १२९.७४ कोटी, वित्तीय संस्थांकडून मिळणाऱ्या निधीतून खर्चासाठी ७.७३ कोटी, संशोधन, विकास निधी २३.४८ कोटी व घसारा निधी १५.०८ कोटी, निलंबन लेखे २२७.६५ कोटी अशी ५१९.०४ कोटी खर्चाची तरतूद प्रस्तावित केली आहे.

11 MAR 2021

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठासभोवती वॉकिंग ट्रॅक

## अंदाजपत्रक सिनेटला सादर; आठ किमीचा मार्ग, १ कोटी १० लाखांची तरतूद

कोल्हापूर, ता. १० : शिवाजी विद्यापीठाच्या संपूर्ण परिसराभोवती वॉकिंग ट्रॅक केला जाणार आहे. त्याची लांबी आठ किलोमीटर असून, त्याच्याशेजारी सायकल ट्रॅक आणि डांबरी रस्ताही असणार आहे. हा ट्रॅक विद्यापीठाच्या कुंपणालगत असणार असून, यामुळे विद्यापीठाची हद्ददेखील निश्चित होणार आहे. नागरिकांना मोकळेपणाने फिरता यावे, रात्री सुरक्षारक्षकांना गस्त घालता यावी, हा उद्देश आहे. या ट्रॅकसाठी १ कोटी १० लाखांची तरतूद अंदाजपत्रकात केली आहे.



शिवाजी विद्यापीठाचे अंदाजपत्रक आज सिनेट हॉलमध्ये मांडले गेले. डॉ. एस. एच. ठकार, डॉ. व्ही. बी. ककडे, डॉ. ए. एस. सरवदे यांच्या समितीने २०२१-२०२२ चे अंदाजपत्रक बनवले. अंदाजपत्रकानुसार विद्यापीठाचा एकूण खर्च ५१९.०४ कोटी असून, अपेक्षित जमा ५१०.२२ कोटी आहे. ८.८२ कोटींची तूट आहे. अंदाजपत्रकार कोरोनाचे सावट असून, खर्चामध्येही ५० टक्के कपात केली आहे. अंदाजपत्रकाचे वाचन ॲड. धैर्यशील पाटील यांनी केले. देखभाल, विकास, वेतन, एजन्सी स्किम आणि निलंबन लेखन या पाच विभागांत अंदाजपत्रक विभागले आहे. क्रीडा, संशोधन, बांधकाम, नूतनीकरण, विद्यार्थ्यांसाठी विविध योजना यासाठी निधीची तरतूद केली आहे. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. व्ही. एन. शिंदे उपस्थित होते.

### अंदाजपत्रकातील ठळक बाबी (आकडे रुपयांत)

- विद्यापीठ ग्रंथालयासाठी - २ कोटी ५० लाख
- संशोधनाला चालना देण्यासाठी - २५ लाख
- ॲकॅडमिक कॉम्प्लेक्ससाठी - २५ लाख रुपये
- खेळाडूंसाठी वैद्यकीय निधी - १० लाख रुपये
- लोकविद्या, लोकसंस्कृती केंद्र - ३.६५ रुपये
- रिसर्च स्किम - ३ कोटी ९१ लाख
- दिव्यांग सुविधांसाठी २ कोटी २५ लाख
- इंडोर स्पोर्टस् कॉँम्प्लेक्स - ५० लाख
- पेटंटसाठी - १० लाख
- छत्रपती संभाजी महाराज रिसर्च सेंटर - ५ लाख
- यूथ होस्टेल ५० लाख

पुढारी

# डॉ. एम. के. भानारकर जागतिक 'आयईईई' परिषदेत सहभागी होणार

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ इलेक्ट्रानिक्स विभागातील प्रा. डॉ. एम. के. भानारकर (कोल्हापूर) जागतिक 'आयईईई' संस्थेतर्फे एप्रिलमध्ये घेण्यात येणाऱ्या परिषदेत सहभागी होणार आहेत. २-४ एप्रिल २०२१ रोजी आयईईईच्या संस्थेची ख२उ७-२०२१ परिषद लोणावळा येथे होणार आहे. वातावरणातील होणारे बदल लक्षात घेता वेगवेगळ्या प्रकारचे घटक प्रामुख्याने वातावरणात आढळतात, त्यापैकी सीओ, ओटू, एनएच-३, अल्करहोल, एलपीजी आदी गॅस कसे मॉनिटर करता येतील हे लक्षात घेऊन या परिषदेत संशोधन पेपर पाठविला होता. त्यास रिव्ह्यू समितीने मान्यता दिली आहे.

लोकमत

# कविता ही तर कवीचे आत्मचरित्र : भोगले

## विद्यापीठात महिला दिनानिमित्त व्याख्यान

कमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** भावनेचे अनेक रंग घेऊन अवतरणारी कविता ही खरं तर कवीचे आत्मचरित्र असते, असे प्रतिपादन ज्येष्ठ मराठी कवयित्री गौरी भोगले यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागात जागतिक महिला दिनानिमित्त त्यांचे 'मी आणि माझी कविता' या विषयावर व्याख्यान झाले. कविता हा कवीचा आत्मस्वर असतो. विविध छंदातून आपल्या संवेदनाची अभिव्यक्ती करत असताना तो आपल्या अनुभवाचीच मांडणी करीत असतो, असे गौरी भोगले यांनी सांगितले. पानगळ, वसा, रिंगण, चांदणवेळ, कोण



शिवाजी विद्यापीठात कवयित्री गौरी भोगले यांचे मराठी अधिविभागात व्याख्यान झाले.

आहेत ते नसतील तर या कविता सादरीकरणातून त्यांनी आत्ममग्नता, सामाजिक अंतरंगाचे दर्शन घडविले. डॉ. नंदकुमार मोरे उपस्थित होते. डॉ. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले.